निवडणूक विषयक बाबींकरिता धोरणात्मक निर्णय घेण्याकरिता सल्ला देण्यासाठी समिती गठीत करणेबाबत

महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग

शासन निर्णय क्रमांक- संकीर्ण २०१८/१३५/प्र.क्र. ६५/३७

मंत्रालय,मुंबई ४०० ०३२.

दिनांक : २७ मार्च, २०१८

<u>प्रस्तावना:</u>

राज्यात तसेच देशात निवडणूका अधिक पारदर्शक व्हाव्यात याबाबत सातत्याने चर्चा होतात. अनुषंगाने तसेच राज्यामध्ये विविध निवडणूकांमध्ये साधनसंपत्तीचा गैरवापर प्रतिबंधित करण्याच्या दृष्टीने अभ्यास करण्याकरीता तसेच लोकसभा व विधानसभा निवडणूका एकत्रित घेण्याबाबतच्या सुरु असलेल्या चर्चेच्या अनुषंगाने तसेच राज्यातील निवडणूका देखील एकत्रित घेता येतील किंवा कसे, याबाबत सल्ला देण्यासाठी समिती गठीत करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता,

शासन निर्णय-

शासन असे आदेश देत आहे की, राज्यातील निवडणूका अधिक पारदर्शी होण्याकरिता विविध निवडणूकांमध्ये साधनसंपत्तीचा गैरवापर प्रतिबंधित करण्याच्या दृष्टीने अभ्यास करण्याकरिता तसेच लोकसभा,राज्यसभा व स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या निवडणूका एकत्रित घेता येईल किंवा कसे यासंदर्भात राज्य शासनास सल्ला देण्याकरिता खालील प्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

१	श्री.सुधीर मुनगंटीवार, मंत्री (वित्त व नियोजन, वने)	अध्यक्ष
२	श्री.डी.के. शंकरन, माजी मुख्य सचिव	सदस्य

सदर समिती खालील मुद्दयांबाबत सल्ला देईल.

१. निवडणूकांमध्ये साधनसंपत्तीचा गैरवापर प्रतिबंधीत करण्याच्या दृष्टीने अभ्यास करुन सल्ला देणे.

२. लोकसभा, विधानसभा तसेच स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूका देखील एकत्रित घेता येतील किंवा कसे याबाबत अभ्यास करुन सल्ला देणे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्यांचा संकेतांक असा २०१८०३२७१४०७१४५१०७ आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Rajagopal Devara
Date: 2018.03.27 14:08:46 +05'30'

(राज गोपाल देवरा)

प्रधान सचिव व मुख्य राज्य शिष्टाचार अधिकारी

प्रत:

१.मा. श्री.सुधीर मुनगंटीवार, मंत्री (वित्त व नियोजन, वने), मंत्रालय, मुंबई

२. श्री.डी.के. शंकरन, माजी मुख्य सचिव, ३७ यशोधन दिनशाव वाच्छार रोड, सी.सी.आय. मुंबई - २०

३. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मुख्यमंत्र्यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई

४. सचिव, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र , पहिला मजला, नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर मुंबई ३२.

५. मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई

६. प्रधान सचिव व मु.रा.अ. यांचे स्वीय सहाय्यक , सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई

७. उप सचिव (कार्या-३७), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई

८. संग्रहार्थ/कार्या-३७